

# चहा, भाजीचा व्यापार!

**(भाग ४)**

## खोलीतली वाढती संख्या

महिनाभराच्या काळात रायकरच्या खोलीतली लोकसंख्या चांगलीच वाढली होती. इतर गोष्टींत माझी परिस्थिती कशीही असली, तरी माझ्या भोवती माणसं जमण्याच्या विषयात मी पहिल्यापासूनच भाग्यवान आहे. रायकरच्या खोलीत मी यायच्या आधी त्या खोलीची लोकसंख्या एकच होती. माझ्यामुळे प्रथम तीन, नंतर चार आणि आता आठ झाली. बाबू पाठक नावाचा नागपूरचा एक संघ स्वयंसेवक काही दिवस संघकार्यालयात राहात असे. तिथं फार दिवस राहाणं बरं नाही, असं वाटून कुठून तरी ओळख काढून तो मला भेटला. मी त्याची अडचण दूर केली. त्याच्याच ओळखीनं नागपूरचा वामन झाडकर आला. झाडकरनं अंबादास नखाते नावाचा नागपूरचाच स्वयंसेवक आणला. आणखी एकजण आला. मात्र कुणाच्या ओळखीनं आला, ते आठवत नाही, पण तो आला आणि सर्वांच्यात मिसळून गेला. तो म्हणजे वासू मेहेंदळे.

रायकरचं खरोखर किती कौतुक करावं, तेच कळत नाही! काही दिवसांपूर्वी आपल्या जागेत एकटा राहात होता. तेव्हा जसा आनंदी असे, तसाच आठजणांची

अनपेक्षितपणे भरती झाली, तरी आनंदी होता. त्यानं सर्वांचं मनापासून स्वागत केलं. हे सर्वचजण विपन्नावस्थेत राहात होते. काहीतरी कामधंदा, नोकरी शोधण्याच्या खटपटीत होते. आता आमचा सामुदायिक अन्नभांडाराचा व्यापही वाढला होता. पिंपुटकर त्याच्या स्वभावामुळे आणि सर्वांना सांभाळून घेण्याच्या वृत्तीमुळे आपोआपच आमचा मॅनेजर झाला. त्याला आम्ही 'मॅनेजर' म्हणू लागलो. रायकर सोडून कुणालाही काही निश्चित उद्योग नव्हता, पण प्रत्येकजण काहीतरी कष्ट करीत होता. सारेजण अतिशय प्रामाणिक होते. पैसा-पैसा वर्गणी करून भात, आमटी, ताक आणि एखादवेळ चहा या प्रकारानं जगत होते.

या आठजणांत अकल्पितपणे एका मुलीची भर पडली. तिचं नाव धोंडू कुलकर्णी. ही कोल्हापूरची, मीही कोल्हापूरचा. माझा पत्ता काढून परिचय करून घेऊन तिचे वडील तिला घेऊन मुंबईला आले. आम्ही आठ ब्रह्मचारी त्या मठात राहात होतो. गायनाचं जन्मजात वरदान लाभलेली निरागस, लोभस अशी ती मुलगी दिवसातला बराच वेळ तिच्या वडिलांसह आमच्या खोलीत असे. तिच्या वडिलांना गाण्याची अतिशय आवड होती. 'लय' हा शब्द त्यांचा परवलीसारखा शब्द होता. गाण्यात लय कशी महत्त्वाची आहे, यावर ते सतत बोलत असत. आपल्या मुलीनं मोठी गायिका व्हावं, ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांची सारखी धडपड असे. धोंडूची त्यावेळची मेहनत पाहून आम्हा सर्वांना, विशेषत: मला आणि रायकरला, तिचं खूप कौतुक वाटायचं. त्यावेळी ती बारा-तेरा वर्षांची असेल. जिचं नाव कुणालाही माहीत नव्हतं अशी ती मुलगी, आमच्या त्या खोलीत, त्या वास्तूत आली आणि ती वास्तूच संगीतमय बनली. कोल्हापुरातून प्रसिद्ध गवई खा. नथ्थन खाँ मुंबईला श्रीमती दुर्गाबाई खोट्यांना शिकवण्यासाठी आले होते. त्यांच्याकडे गाणं शिकायला मिळावं आणि 'हिज मास्टर्स व्हॉइस'मध्ये रेकॉर्ड्स काढल्या जाणार होत्या, म्हणून धोंडूला तिचे वडील मुंबईला घेऊन आले होते.

अशा रीतीनं आमच्या खोलीची लोकसंख्या दहा झाली. रात्री मात्र आठच असे. कारण धोंडू व तिचे वडील झोपायला त्यांच्या ओळखीच्या आणखी एका घरी जायचे.

हळूहळू आमच्यातील काहींना थोडंथोडं कामही मिळू लागलं.

### अन्नासाठी हातगाडीमागे

झाडकर 'मेट्रो मोटर्स'मध्ये एव्हिएशन इंजिनियरिंगचा कोर्स अॅप्रेंटिस म्हणून करत होता. बाबू पाठकही एका मोटारच्या कारखान्यात उमेदवारी करू लागला. गाडगीळची नोकरीची खटपट चालूच होती. पण दैव साथ देत नव्हतं. पण अकस्मात त्याला व आमच्यातलाच एकजण वासू मेहेंदळे यांना नोकऱ्या लागल्या. त्या वेळी नुकतंच गिरगावात तांब्यांचं 'कोना रेस्टॉरंट' सुरू झालं होतं. त्या रेस्टॉरंटमध्ये मेहेंदळेला नोकरी मिळाली. मेहेंदळे अक्षरश: वेटर होता. टेबल पुसणं, कपबशा उचलणं ही कामं त्याला करावी लागत. 'कोना रेस्टॉरंट'बरोबर 'कोना बेकरी'ही सुरू झाली होती. गाडगीळ 'कोना बेकरी'च्या सायकलगाडीनं पाव वाटत असे. त्यामुळे दोघांच्या दोन्ही वेळच्या

जेवणाची आणि फराळाची सोय झाली. ही कामं हलकी वाटत असली, तरी त्या परिस्थितीत ते एक वरदानच होतं. अंबादास नखातेच्या वडिलांचं नागपुरात किराणा मालाचं दुकान होतं. तो मुंबईतून काही माल नागपूरला पाठवून आपलं पोट भागवू लागला. पिंपुटकरला पोटापुरतं मिळत होतं. रायकरला प्रश्नच नव्हता. राहिलो केवळ मी! मला जगण्याचं काहीच साधन नव्हतं. गायन हा काही जगाच्या दृष्टीनं अत्यावश्यक व्यवसाय नव्हता. कित्येक महिन्यांत माझा निश्चित असा पत्ता नसल्यामुळे रेडिओचे कार्यक्रम बंद झाले होते. मी रेडिओच्या अधिकाऱ्यांना भेटून विनंती केली, पण कुणी लक्ष दिलं नाही. दहा रुपये फीवाला आर्टिस्ट कुणाच्याच लेखी आवश्यक नव्हता.

माझ्याशिवाय इतरांना आता पोट भागवण्याचं साधन उपलब्ध झाल्यामुळे आमच्या खोलीतलं अन्नभांडार बंद झालं. माझ्या एकट्यासाठी स्टोव्ह पेटवणं, तांदूळ, आमटी, दही, चहा वगैरे होणं कठीण झालं. यासाठी लागणारा पैसा माझ्याजवळ नव्हता. नोकरी किंवा काही उद्योग करून पैसे मिळवून त्यावर पोट भरणं अजूनही माझ्या नशिबात नव्हतं. त्यामुळे पुन्हा उपासमार होऊ लागली. खोलीतल्या एवढ्या लोकसंख्येला माझी उपासमार समजणं लाजिरवाणं वाटत होतं. त्यामुळं उपाशी राहूनही मी आनंदी दिसायचा प्रयत्न करीत असे. परमेश्वर माझी अत्यंत कठोर, जीवघेणी परीक्षा पाहत होता. पण त्याच वेळी काही तुटके-फुटके मार्गही दाखवीत होता. त्या वेळी नुकताच 'डालडा' बाजारात आला होता. निरनिराळ्या प्रकारानं त्याची जाहिरात केली जात होती. त्यातलाच एक भाग म्हणून पेटलेली शेगडी, त्यावर कढई, त्यात डालडा, शेजारीच पोळपाट-लाटणं आणि मळलेली कणीक असं सगळं हातगाडीत ठेवून नाक्यानाक्यांवर थांबून ह्या शेगडीवर 'डालडा'त तळलेल्या गरम गरम पुऱ्या वाटण्याचा प्रकार सुरू झाला होता. त्याबरोबरच 'डालडा'च्या लहान लहान डब्या सँपल म्हणून फुकट वाटत असत. हा शोध मला अचानक लागला. माझ्याकडे वेळच वेळ होता. त्यामुळे मी माझा मोर्चा रोज त्या गाडीमागोमाग वळवीत होतो. नाक्या-नाक्यांवर गरम पुऱ्या मिळवून खाण्याचा उद्योग हळूहळू मला चांगला जमू लागला!

त्या हातगाडीभोवती खूपच गर्दी असे. कारण त्या पुऱ्या फुकट मिळत. प्रथम प्रथम गाडीवाला हात पुढं करताच पुऱ्या देई. पण हळूहळू त्याच्या लक्षात येऊ लागलं की, हे एक ठरावीक कारटं प्रत्येक नाक्यावर येऊन पुऱ्या मागतं. मग त्यानं मला पुऱ्या देणं बंद केलं. पण यावरही माझ्याकडे तोड होतीच. रोज गर्दी वाढत जायची. त्यामुळे पुऱ्यांकरिता झुंबड उडायची. झटापटीही व्हायच्या. त्या गर्दीत गाडीवाल्याला माझं तोंड न दिसता फक्त हात दिसेल, अशा तऱ्हेनं मी उभा राहायचो. एखादी पुरी हातावर पडायची. या पुऱ्यांच्या बरोबर 'डालडा'च्या वाटल्या जाणाऱ्या छोट्या छोट्या सँपल डब्याही मी जमा करायचो. असा हा पोट जाळण्याचा खेळ काही दिवस चालला. त्या हातगाड्यांची वेळ ठरावीक असे. त्यामुळे उरलेला वेळ मी रिकामा असे, त्या वेळी रायकरच्या कवितांना चाली लावत असे.

रायकरनं 'क्रांतीची ज्योत' नावाची एक नाटिका लिहिली. त्यातल्या पदांना मी चाली लावल्या. त्याशिवाय 'प्रगटली परहिता, जणू जगी देवता', 'रणशिंग फुंक वीरा क्रांतिकारा', 'स्वतंत्रतादेवी आली चला स्वागताला, गुंफू जीवनाच्या माला तिच्या पूजनाला' अशा कितीतरी कवितांना मी त्या काळात चाली लावल्या. रायकरच्या 'युवक सन्मित्र मंडळ' आणि 'महिला सेवादला'च्या मुली त्या कविता माझ्या चालीत म्हणू लागल्या. याच काळात धोंडू कुलकर्णीला मी काही गाणी शिकवली. त्यांतलं 'चल झणी जाऊ किशोरी वनांतरी' हे पद तिलक कामोद रागात स्वरबद्ध करून रेकॉर्डसाठी बसवलं. पण रेकॉर्ड्स घ्यायचं ठरवूनही एच. एम. व्ही. कंपनीनं तिचं रेकॉर्डिंग केलं नाही. बहुधा पैशात जमलं नाही, म्हणून तिच्या वडिलांनी नकार दिला, असं काहीतरी झालं. तिचा एक कार्यक्रम करायचं आम्ही ठरवलं. कार्यक्रमासाठी लागणारा खर्च मी सोडून बाकी साऱ्यांनी केला. हँडबिलं छापून घेतली. ती छापायच्या वेळी धोंडूला मी एक वेगळं नाव सुचवलं. उत्फुल्ल कमळासारख्या दिसणाऱ्या त्या गोऱ्यापान, नीटस मुलीला धोंडू हे नाव कसंतरीच वाटत होतं. मी त्याऐवजी 'कौमुदी' हे नाव सुचवलं. तिलाही ते आवडलं. तिच्या वडिलांना न सांगता आम्ही जाहिरातीत ते नाव छापून टाकलं. तिचा कार्यक्रम छान झाला. तिला थोडी प्रसिद्धीही मिळाली. पण मुंबईत येण्याचा उद्देश सफल न झाल्यामुळे ती दोघं परत कोल्हापूरला गेली.

'डालडा पुऱ्या मोहीम' आणि 'गाणं' हे काही दिवस बिनतक्रार चाललं होतं. पण पुढं पुढं मी दिसलो की, तो हातगाडीवाला शिव्या देत मला मारायला यायचा. त्यामुळं पुऱ्या मिळणंही बंद झालं.

आता माझे दोन मित्र गाडगीळ आणि मेहेंदळे माझ्या मदतीला धावून आले. ते 'कोना रेस्टारंट'मधून कधीकधी एखादा मोठा पाव माझ्यासाठी आणायचे. 'डालडा'च्या सँपल डब्या माझ्याकडे होत्याच. 'डालडा' लावलेला पाव मोठा मस्त लागत असे. असा एक पाव मला एका दिवसाला पुरा होई. माझं खाणंही आता हळूहळू कमीच होऊ लागलं होतं. थोडंसं खाल्लं तरी पोट भरत असे. त्या परिस्थितीत ते उत्तमच होतं. अन्न मिळणंच कठीण होतं, या दृष्टीनं हे बरं असलं, तरी त्यामुळे माझी प्रकृती मात्र झपाट्यानं खालावू लागली.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)